इराणी करंडक

सलग दुसऱ्या डावात हनुमा विहारीचं शतक, शेष भारताचा डाव सावरला

नवी दिल्ली : पहिल्या डावात विदर्भाने ९५ धावांची आघाडी घेतल्यानंतर, शेष भारताने दुसऱ्या डावात दमदार पुनरागमन केलं आहे. हनुमा बिहारी आणि कर्णधार अजिंक्य रहाणेच्या शतकी भागीदारीच्या जोरावर शेष भारताने दुसऱ्या डावात शतकी आघाडी घेतली आहे. हनुमा बिहारीने सलग दुसऱ्या डावात शतकी खेळी करत, आपल्यातला फॉर्म अजुनही कायम असल्याचं दाखवून दिलं. पहिल्या डावात हनुमा बिहारीने ११४ धावा काढल्या होत्या. त्याच्या याच खेळीच्या जोरावर शेष भारताने पहिल्या डावात ३३० धावांपर्यंत मजल मारली होती.

दुसऱ्या डावात केलेल्या शतकी खेळीसह हनुमा बिहारीने एक अनोखा विक्रम आपल्या नावे केला आहे. इराणी चषकात सलग तीन डावांमध्ये शतक झळकावणारा हनुमा बिहारी पहिला फलंदाज ठरला आहे. ७० च्या दशकात दिलीप वेंगसरकर यांना हा विक्रम आपल्या नावे करण्याची संधी होती, मात्र दुसऱ्या डावात वेंगसरकर ९० धावांवर बाद झाले होते.

भारतीय संघाची निवड

IND vs AUS जडेजाला वगळले, राहुलला संधी

नवी दिल्ली : ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या आगामी मर्यादित षटकांच्या क्रिकेट मालिकांसाठी भारतीय संघाची निवड करण्यात आली आहे. दोन टी-२० आणि पाच एकदिवसीय सामन्यांसाठी भारतीय संघाची निवड करण्यात आली आहे. भारतीय संघामध्ये बुमराह आणि कर्णधार विराट कोहलीचे पुनरागमन झाले आहे. ऑस्ट्रेलिया दौऱ्यात अपयशी ठरलेल्या के.एल राहुलला भारतीय संघात स्थान देण्यात आले आहे. विश्वचषकासाठी केएल राहुलला तिसरा सलामीवीर म्हणून पडताळण्याची ही अखेरची संधी आहे. तर फिरकीपटू रवींद्र जाडेजा, खलील अहमद, सिराज यांना डच्चू देण्यात आला आहे. उमेश यादव आणि सिद्धार्थ कौल यांना संधी देण्यात आली आहे. एकदिवसीय सामन्यातून दिनेश कार्तिकला वगळण्यात आले आहे. विजय शंकर आणि पंतला टी-२० आणि एकदिवसीय सामन्यात संधी दिली आहे. दोन टी-२० आणि पहिल्या दोन एकदिवसीय सामन्यात भुवनेश्वरला आराम देण्यात आला आहे. भारतीय संघ ऑस्ट्रेलियाविरुद्ध २४ फेब्रुवारीपासून दोन ट्वेन्टी-२० आणि पाच एकदिवसीय सामन्यांची मालिका खेळणार आहे. ३० मेपासून इंग्लंडमध्ये सुरू होणाऱ्या विश्वचषकाआधी ही भारताची अखेरची स्पर्धा आहे. त्या पार्श्वभूमीवर काही विशिष्ट जागांवर लक्ष केंद्रित केल्याचे संघनिवडीवरून दिसत आहे. **दोन टी-२० साठी भारतीय संघ** - विराट कोहली, रोहित शर्मा, केएल राहुल, शिखर धवन, पंत, कार्तिक, धोनी, हार्दिक पांड्या, कृनाल, बुमराह, शामी, चहल, विजय शंकर, उमेश यादव, सिद्धार्थ कौल, मयांक मार्कंडेय.



पहिल्या दोन एकदिवसीय सामन्यासाठी भारतीय संघ- विराट कोहली, रोहित शर्मा, शिखर धवन, अंबाती रायडू, केदार जाधव, धोनी, हार्दिक पांड्या, बुमराह, शामी, चहल, कुलदीप, विजय शंकर, पंत, सिद्धार्थ कौल, केएल राहुल.

दुबईत पाकिस्तान सुपर लीगला सुरुवात

दुबई - पाकिस्तान सुपर लीगच्या चौथ्या सत्रास दुबई आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर सुरुवात झाली आहे.

पीएसएलमध्ये यंदा ६ संघांचा सहभाग असणार आहे. यात दोनदा चॅम्पियन ठरलेला इस्लामाबाद युनायटेड, एक वेळचा विजेता पेशावर जुल्मी संघ तसेच लाहोर कलंदर, मुल्तान सुल्तान, कराची किंग्स आणि क्वेटा ग्लेडिएटर या संघांचा समावेश आहे.

पीएसएलच्या चौथ्या सत्राचे लाईव्ह प्रसारण डी स्पोर्ट्स चॅनलवर होणार आहे. लीग १४ फेब्रुवारी ते १७ मार्च दरम्यान खेळविली जाणार आहे.

बेलारुसमध्ये युरोपा लीग फुटबॉलमध्ये चेंडूसाठी संघर्ष करताना आर्सेनल व बेटीसचा खेळाडू.

मणिपूरचा खेळाडू भारतीय संघात

नवी दिल्ली : मणिपूरमधील १८ वर्षीय खेळाडू रेक्स राजकुमार सिंह भारताच्या अंडर-१९ संघात निवड झाली आहे. भारतीय संघात स्थान मिळवणारा रेक्स हा मणिपूरचा पहिला खेळाडू आहे. रेक्स सिंह हा जलगती गोलंदाजी करतो. डिसेंबर २०१८ मध्ये रेक्स सिंह ११ धावांच्या मोबदल्यात दहा बळी घेत रेक्स सिंहने भारतीय क्रीडा विश्वाचे लक्ष वेधले होते. रेक्सने कामगिरीच्या बळावर भारतीय क्रिकेट नियामक मंडळाला (बीसीसीआय) भारतीय संघात घेण्यास भाग पाडलं. बीसीसीआयने नुकत्याच जाहीर केलेल्या १९ वर्षांखालील भारतीय संघात रेक्सची निवड केली आहे. दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या दोन चार दिवसीय सामन्यांसाठी रेक्सची भारतीय संघात निवड करण्यात आली आहे. डिसेंबर २०१८ मध्ये कूच बिहार ट्रॉफीत मणिपूर संघाकडून खेळताना रेक्सने प्रतिस्पर्धी अरुणाचल प्रदेशचा संपूर्ण संघ तंबूत पाठवला होता. त्याने ९.५ षटकांत ११ धावांच्या मोबदल्यात दहा बळी घेतले होते. १८ वर्षीय रेक्सला बीसीसीआयने या दमदार कामगिरीचे बक्षीस दिले आहे. भारताचा माजी कर्णधार राहुल द्रविड याच्या मार्गदर्शनाखाली त्याला अंडर -१९ संघात रेक्सला संधी मिळाली आहे.

सिंधूची उपांत्यपूर्व फेरीत आगेकूच!

नवी दिल्ली : रिओ ऑलिम्पिकच्या रौप्यपदक विजेत्या अग्रमानांकित पी. व्ही. सिंधूने गुरुवारी राष्ट्रीय बॅडमिंटन स्पर्धेची उपांत्यपूर्व फेरी गाठली. मात्र राष्ट्रकुल सुवर्णपदक विजेत्या सायना नेहवालने निकृष्ट दर्जाच्या कोर्टमुळे सामना खेळण्यास नकार दर्शवल्याने आयोजनावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. भारताची आघाडीची बॅडमिंटनपटू सिंधूने महिला एकेरीच्या उपउपांत्यपूर्व फेरीच्या लढतीत नागपूरच्या मालविका बनसोड हिच्यावर २१-११, २१-१३ अशी सरळ दोन सेटमध्ये मात केली. सिंधूने फोरहँड व क्रॉसकोर्टच्या फटक्यांचा सुरेख वापर करतानाच स्वत:ला अधिक थकवा जाणवणार नाही, याचीही काळजी घेतली. त्यानंतर सायना व श्रुती मुंदडा यांच्यातील सामना सुरू होण्यापूर्वीच सायनाने कोर्टची पाहणी करण्याचा निर्णय घेतला व कोर्टवरील लाकडी आवरण उंच-सखल असल्यामुळे अखेर सायनाने दुखापतीचा धोका उद्भवू शकतो, या कारणास्तव खेळण्यास नकार दिला. पुढील महिन्यात होणाऱ्या ऑल इंग्लंड बॅडमिंटन स्पर्धेपूर्वी कोणताही धोका पत्करण्यास भारतीय खेळाडू तयार नसल्याचे यामधून सिद्ध झाले. आसाम बॅडमिंटन अकादमीच्या तीन कोर्टवर या स्पर्धेचे सामने खेळवण्यात येत असून सायनाला गतवर्षी पायाच्या दुखापतीने ग्रासले होते, त्यामुळे तिने त्वरित खेळण्यास नकार दिला. दरम्यान, भारतीय बॅडमिंटन संघटनेने (बीएआय) या प्रकरणाची दखल घेतली असून रद्द झालेले सामने बंदिस्त स्टेडियममध्ये खेळवण्यात येतील, असेही जाहीर केले. सिंधूव्यतिरिक्त अनुक्रमे तिसऱ्या व चौथ्या मानांकित अस्मेसी अश्मिता व श्रियांशी परदेशी यांनीही उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला. पुरुष एकेरीत अव्वल मानांकित समीर वर्माने पायाच्या दुखापतीमुळे आर्यमन टंडनविरुद्ध २१-१६, १-८ अशी आघाडी असताना माघार घेतली. मात्र सायनाने तक्रार नोंदवल्यानंतर बी साईप्रणीत व पारुपल्ली कश्यप यांचे सामनेही पुढे ढकलण्यात आले. याव्यतिरिक्त माजी विजेत्या सौरभ वर्मा, लक्ष्य सेन यांनी उपांत्यपूर्व फेरी गाठली. सौरभने कार्तिक जिंदालवर २१-८, २१-१५ असा विजय मिळवला, तर लक्ष्यने अन्साल यादवला २१-११, २१-८ अशी सहज धूळ चारली. पुरुष दुहेरीत प्रथम मानांकित अर्जुन एमआर आणि श्लोक रामचंद्रन यांच्या जोडीने रोहन कपूर व सौरभ वर्मा यांना २१-११, २१-१८ असे पराभूत करत उपांत्य फेरीत धडक मारली, तर प्रणव चोप्रा व चिराग शेट्टी यांनीसुद्धा उपांत्य फेरीतील स्थान निश्चित करताना रुपेश कुमारआणि व्ही दिजू यांना २१-८, १८-२१, २२-२० असे रोमहर्षक लढतीत नमवले. सिंधूच्या सामन्यानंतर कोर्टवरील काही ठिकाणचे लाकडाचे तुकडे बाहेर आले असून ते पुन्हा चिकटवण्यासाठी आयोजकांना वेळ लागणार आहे. ऑल इंग्लंडसारखी महत्त्वाची स्पर्धा तोंडावर असल्यामुळे कोणताही खेळाडू त्यांच्या तंदुरुस्तीशी तडजोड करू इच्छित नाही. त्यामुळे माझ्यासह सायना व साईप्रणीतचे सामने पुढे ढकलण्यात आले आहेत.

स्वीडनमध्ये स्लोवाकियाची पेट्रा व्हिहोरा महिलांच्या स्लेलम रेसमध्ये भाग घेताना.

मराठमोळ्या पीळदार सौंदर्यवतींमध्ये रंगणार पोझयुद्ध

परळच्या रेल्वे वर्पशॉपच्या मैदानात प्राथमिक फेरीसाठी आज शनिवारी द्वंद्व

मुंबई : जिसका हमें था इंतजार, वो घडी आ गई... खरोखरच मुंबईकरांचा आणि मराठमोळ्या युवकांचाच्युवतींचा उत्साह वाढवेल, अभिमानाने छाती फुगवेल असा क्षण दोन दिवस रंगणाऱ्या मुंबई श्रीच्या निमित्ताने अनुभवायला मिळणार आहे. भारतीय शरीरसौष्ठवात सर्वाधिक मानाची आणि प्रतिष्ठेच्या असलेल्या मुंबई श्री स्पर्धेत फिजीक स्पोर्टस् प्रकारात म्हणजेच मिस मुंबईसाठी तब्बल पाच पीळदार सौंदर्यवतींनी आपला सहभाग नोंदविला असून यात दोन मराठमोळ्या महिलांचाही समावेश आहे. तसेच प्रदर्शनीय होणाऱ्या शरीरसौष्ठव स्पर्धेत आमला ब्रम्हचारी आणि श्रद्धा डोके या मराठमोळ्या कन्या आपल्या सौष्ठवाचे प्रदर्शन करून मुलींना या क्रीडा क्षेत्रात झेप घेण्यासाठी बळ देण्याचे प्रयत्न करणार आहेत.

परळ रेल्वे वर्पशॉपच्या मैदानात होणारा मुंबई फिटनेस सोहळा ऐतिहासिक आणि संस्मरणीय ठरणार आहे. प्रथमच मुंबई श्री हा महोत्सव दोन दिवस साजरा केला जाणार असून मुंबईकरांना फिट ठेवण्यासाठी आवश्यक साऱ्या गोष्टी एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्याची किमया आरोग्य प्रतिष्ठानने साकारली आहे. खेळाडूंना श्रीमंत करणाऱ्या स्पर्धेत शरीरसौष्ठवालाही नवी झळाळी देण्याचा प्रयत्न आरोग्य प्रतिष्ठानने केला असल्याची माहिती प्रतिष्ठानचे अध्यक्ष किरण कुडाळकर यांनी दिली. आठ लाखांची रोख बक्षिसे आणि सर्वांना आपल्या प्रेमात पाडणारा भव्य दिव्य चषक हेच यंदाच्या मुंबई श्रीचे आकर्षण असले तरी मिस मुंबई स्पर्धासुद्धा आकर्षक होणार असल्याचे बृहन्मुंबई शरीरसौष्ठव संघटनेचे सरचिटणीस राजेश सावंत यांनी सांगितले. शनिवारी स्पर्धेची प्राथमिक फेरी होणार असून रविवारी अंतिम फेरीचा थरार रंगेल. त्यामुळे मुंबईच्या शरीरसौष्ठवाची खरी ताकद पाहायची असेल तर मुंबईकरांनी शनिवारी या स्पर्धेला नक्की भेट द्यावी, असे आवाहनही आरोग्य प्रतिष्ठानच्या प्रभाकर कदम यांनी केले आहे.

गतवर्षी या स्पर्धेला अत्यल्प प्रतिसाद लाभल्यामुळे मिस मुंबई स्पर्धा होऊ शकली नव्हती.मात्र यंदा या स्पर्धेला पाच पीळदार सौंदर्यवतींनी आपली नोंदणी केली आहे. जमलेल्या हजारो प्रेक्षकांसमोर पीळदार सौंदर्याचे प्रदर्शन करणे, हे धाडसाचेच काम आहे. मात्र मॉडेल फिजीक प्रकार हा एक क्रीडा प्रकार आहे आणि आम्ही एक खेळाडू आहोत, या भावनेने मंजिरी भावसार, दिपाली ओगले या मराठमोळ्या कन्यांसह हीरा सोलंकी, निशरीन पारेख आणि नीना पंजाबी या मुंबईकर समस्त महिला वर्गाला फिटनेसचे महत्व पटावे म्हणून मिस मुंबईच्या मंचावर बिकिनीवर उतरून आपल्या फिटनेसचे अनोखे प्रदर्शन करणार आहेत.

बिकिनीची कसली भीती? हा तर या खेळाचा गणवेश...

बिकिनीवर कसं उतरायचं...? समाजाला काय वाटेल? लोकं काय म्हणतील? याचा विचार करायचा असेल तर तुम्ही या खेळात येऊच नका. इतर खेळांप्रमाणे हासुद्धा एक खेळ आहे आणि बिकिनी या खेळाचा गणवेष आहे. एकदा का तुमच्या मनातली बिकीनीविषयीची भीती संपली तर तुमच्यासाठी आकाशही ठेंगणं वाटेल. आम्ही या खेळात आलोय ते आमच्या मुंबईचं, आमच्या राज्याचं आणि आमच्या देशाचं नावं उज्ज्वल करायला. आम्हाला यासाठी आमच्या कुटुंबाचं खूप मोठं पाठबळ मिळालंय.



कुटुंबासारखी संघटना मिळालीय आणि क्रीडाप्रेमी हे आमचे नातेवाईक आहेत. त्यामुळे आम्हाला आता बिकीनी घालायची जराही भीती वाटत नाही. लोकांचा आमच्याकडे आणि आमच्या खेळाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलत चाललाय. आज महिला सर्वच क्षेत्रात पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून चालताहेत. मग शरीरसौष्ठवात तरी आम्ही का मागे राहायचं? आता आम्ही पुढे आलो आहोत. ज्यांना फिटनेसची आवड आहे, त्यांनी पुढे यावे असे आवाहन स्पर्धेत सहभागी होणाऱ्या मंजिरी भावसार, दिपीका ओगले, आमला ब्रम्हचारी आणि श्रद्धा डोके या मराठमोळ्या कन्यांनी केलं आहे. फिजीक स्पोर्टस् गटात उतरणाऱ्या पाचही खेळाडू चांगल्याच तयारीत असल्यामुळे या गटात मिस मुंबईचा किताब जिंकण्यासाठी प्रथमच चुरस पाहायला मिळेल, असा विश्वास शरीरसौष्ठव संघटनेचे अध्यक्ष अमोल किर्तीकर यांनी बोलून दाखविला.

आमला आणि श्रद्धाचं शो पोझिंग

मॉडेल फिजीक असो किंवा महिला शरीरसौष्ठव या खेळाकडे आता कुठे महिलांचा आकडा वाढतोय. हा आकडा आणखी वाढावा म्हणून प्रथमच मुंबई श्री स्पर्धेत महिला शरीरसौष्ठवपटू आपल्या पीळदार सौष्ठवाचं प्रदर्शन करणार आहेत. या खेळात महिलांचा सहभाग वाढावा, याच एकमेव हेतूने या दोघी मंचावर उतरणार आहेत. गेल्या वर्षभरापासून शरीरसौष्ठवाकडे आकर्षित झालेल्या आमलाने प्रचंड मेहनत घेत आपल्या शरीराला आखीवरेखीव केले आणि ती चक्क फेडरेशन चषकात उतरली. प्रथमच शरीरसौष्ठवाच्या मंचावर उतरणाऱ्या आमला धमाल उडवत आपल्या गटात सुवर्णपदक जिंकून ऐतिहासिक कामगिरी केली. तसेच आंतरराष्ट्रीय पॉवरलिफ्टर असलेली श्रद्धा डोके आता आंतरराष्ट्रीय शरीरसौष्ठवपटू बनण्याचं स्वप्न उराशी बाळगून प्रथमच शरीरसौष्ठव प्रदर्शन करण्यासाठी सज्ज होतेय. दोन वर्षांपूर्वी सुब्रता क्लासिक आंतरराष्ट्रीय पॉवरलिफ्टींग स्पर्धेत स्ट्रॉंगेस्ट विमेनचा किताब पटकावणाऱ्या श्रद्धाचे ध्येय आता सिक्स पॅक कमावून भारताला सुवर्ण जिंकून द्यायचे हे आहे.

मुंबई श्रीमध्ये विक्रमी शरीरसौष्ठवपटूंचा सहभाग

सर्वार्थाने विक्रमी ठरणाऱ्या मुंबई श्री मध्ये मुंबईचे पीळदार ग्लॅमर विक्रमी संख्येने उतरणार, हे निश्चित आहे. तब्बल आठ लाखांपेक्षा अधिक रकमेचे पुरस्कार असलेल्या या स्पर्धेत प्रत्येक गटात २५ पेक्षा अधिक स्पर्धक उतरणार असल्याची शक्यता शरीरसौष्ठव संघटनेचे सरचिटणीस सुनिल शेगडे यांनी व्यक्त केली आहे. सध्या सुपर फॉर्मात असलेला सुशील मुरकर, रोहन गुरव, दीपक तांबिटकर, महेश राणे आणि गतवेळचा उपविजेता सकिंदर सिंग हे सारे मुंबई श्रीचा मान मिळविण्यासाठी आसुसलेले आहेत. या स्पर्धेपासून गतविजेत्यांनासुद्धा खेळता येणार आहे. मात्र सुजन पिळणकर, अतुल आंब्रे हे गतविजेते खेळणार आहेत की नाही याबाबत कोणतीही माहिती संघटना देऊ शकलेली नाही. भारत श्री सुनीत जाधवने आपण खेळणार नसल्याचे आधीच स्पष्ट केले आहे. मात्र महाराष्ट्र श्री स्पर्धेसाठी जाधवसह सागर कातुर्डे, सागर माळीसारखे अनेक तयारीतले खेळाडू पोझ द्यायला उतरतील. या स्पर्धेत महिलांसह पुरुषांचेही फिजीक स्पोर्टस् होणार असून यातही शंभरच्या आसपास मॉडेल दिसणारे खेळाडू सहभागी हणार आहेत.